# बंधुतेचा संदेश देणारे
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



सब के लिये खुला है
मंदिर ये हमारा।
मतभेद को भुला है
मंदिर यह हमारा॥
आओ कोई भी धर्मी,
आओ कोई भी पंथी।
देशी-विदेशीयो को
मंदिर ये हमारा॥

भारतात अनेक धर्म-पंथाचे लोक राहतात.
या सर्वांना सुखसमाधानाने राहता यावे
यासाठी आपण आपल्या मनाचे ‘मंदीर’ सर्वांसाठी
खुले केले पाहिजे; सर्वांशी बंधुतेने आणि
एकतेने वागा – राष्ट्रसंतांचा हा संदेश संविधानातील
धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याशी (कलम 25) सुसंगत आहे.




**संविधान जागर अभियान**

# लोकशाही रुजवणारे
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



लोकशाही म्हणजे
लोकांचे हित ।
लोकांकडूनि व्हावे हातोहात ।
सर्व मालक म्हणोनि सत्य ।
जबाबदारी ओळखावी ॥
लोकशाहीत जो सत्ताधारी ।
तो मालक नव्हेचि निर्धारी ।
लोकसेवेचा कारभारी ।
जबाबदारी हे त्याची ॥

लोकशाहीत जनताच देशाची खरी ‘मालक’ असते. सत्तेत असलेल्यांनी स्वतःला मालक समजू नये; ते जनतेचे सेवक आहेत आणि जनतेचे कल्याण करणे ही त्यांची जबाबदारी आहे – राष्ट्रसंतांचा हा विचार भारतीय संविधानातील ‘लोकशाही’ मूल्याशी तंतोतंत जुळतो.




**संविधान जागर अभियान**

# सामाजिक न्यायाची शिकवण देणारे
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



महात्मा गांधी, ज्योतिबा फुले ।
यांनी मर्म हें ओळखलें ।
दलितोन्नतीचें कार्य केलें ।
कर्तव्य आपुले
तेंचि असे ॥
मानवे मानवा
समान समजणें ।
हीच खरी धर्मसेवा ॥

शोषित समाजाला विकासाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक न्याय. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा यांकडून आलेला हा विचार तुकडोजी महाराजांनी लोकांना दिला. दलितांच्या उद्धाराचे कार्य करणे, हीच खरी धर्मसेवा आहे, असे राष्ट्रसंत म्हणतात. हेच भारतीय संविधानातील सामाजिक न्याय (कलम 38) होय.




**संविधान जागर अभियान**

# स्त्रीमुक्तीची हाक देणारे
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



हीन-दुबळें केलें स्त्री-समाजा ।
तैसीच पुढे वाढली प्रजा ।
म्हणती स्त्रीजात
तेवढी पशूच समजा ।
पाशवी झालें जग सारे ॥
सर्व सोयी पुरुषांकरितां ।
स्त्रियांसाठी सर्व व्यथा ।
हे कोण बोलते
शास्त्र आता?
द्यावे हातां झुगारोनि ॥

शेकडो वर्षांपासून महिलांवर हीनपणा लादला गेला. हे
पाशवी जग स्त्रियांना पशूसमान वागवते.
पुरूष श्रेष्ठ आणि स्त्रिया कनिष्ठ - असे कोणते शास्त्र जर
म्हणत असेल, तर हे आपण झुगारून दिले पाहिजे.
असे परखड विचार राष्ट्रसंतांनी मांडले आहेत.
भारतीय संविधानही महिलांना आत्मसन्मानाने
जगता यावे म्हणून समतेचा अधिकार (कलम 15) देते.




**संविधान जागर अभियान**

# खरा ‘राजधर्म’ शिकवणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



**जैसे बापास**
**पुत्र सारिखे ।**
**तैसे गरीब, श्रीमंत**
**राजाचे सखे ।**
**हा भेद मिटविणे**
**काम निके ।**
**त्याचेचि**
**असे राजधर्म ॥**

अन्न-वस्त्र-निवारा-आरोग्य-शिक्षण या मूलभूत गरजा पूर्ण झाल्याशिवाय गरीबाच्या घरात सुख-शांती नांदू शकत नाही. काहीनी खूप बुद्धी लढवून अतोनात संपत्ती जमवली आहे. त्यामुळे शासनाने श्रीमंत-गरीबांमध्ये भेद न करता ‘देशातील आर्थिक विषमता कमी करावी’- हाच खरा ‘राजधर्म’ आहे. राष्ट्रसंतांचे हे परखड विचार भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वांशी (कलम 39) तंतोतंत जुळतात.




**संविधान जागर अभियान**